"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : ०२२ – ४७४९ ८२५९ / ९८६७६ ७४८६४

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

नास्ति विद्या समं चक्षु नास्ति सत्य समं तपः ।
नास्ति राग समं दुःखं नास्ति त्याग समं सुखं ॥

॥ देव बरे करु ॥

| क्रमांक २ | वर्ष : ४८ | जुलै–सप्टेंबर २०२६ |
| --- | --- | --- |

**BOOK PACKET** मूल्य रु. ५

Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

# तेंडुलकर हॉल मधील कार्यक्रम



प्रमुख पाहुण्या श्रीमती हिमांगी नाडकर्णी (अध्यक्ष, एन्.के.जी.एस्.बी.) दीप प्रज्वलीत करताना.
बाजूला लेखिका मीरा प्रभू वेर्लेकर व शैलजा नाडकर्णी दिसत आहेत.

पुस्तक प्रकाशित झाल्याचा फोटो. यात डावीकडून उजवीकडे वृंदा पै, लेखिका मीरा प्रभू वेर्लेकर, शैलजा नाडकर्णी, सुरेश पालेकर, शिरीष वाघ व ज्यांच्या हातून ''शब्दसरिता'' पुस्तकाचे अनावरण झाले त्या NKGSB च्या अध्यक्षा हिमांगी नाडकर्णी.





''शब्दसरिता'' पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याला ठाणे मंच तर्फे उपस्थित ज्ञातीबांधव.

## महिलांचा स्नेह मेळावा : भगिनींस निमंत्रण

नेहमीचा श्रावणातला महिलांचा स्नेह मेळावा समारंभ यंदा जोगेश्वरी व मुलुंड येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य उपस्थित राहावे.

**जोगेश्वरी**

**तारीख :** शुक्रवार, २१ ऑगस्ट २०२६

**स्थळ :** रामेश्वर मंदिर सभागृह, सरस्वती बाग, जोगेश्वरी (पूर्व)

**वेळ :** संध्याकाळी ५ ते ७

संघ कार्यकारीणी तर्फे

**शांता पालेकर ८८५००६६३८३**

**विद्या वागळे ९८९२३७९५२०**

**ठाणे**

**तारीख :** शुक्रवार, २१ ऑगस्ट २०२६

**स्थळ : सुरेखा सुरेश पालेकर** यांचे निवास स्थान, ७ दीपदर्शन सोसायटी, सहयोग मंदिर पथ, नौपाडा, ठाणे (प.)

**वेळ :** संध्याकाळी ४ ते ७

ठाणे मंच कार्यकारीणी तर्फे

**सुरेखा पालेकर – ९०८२६ ६२०१९**

**ज्योति सुखठणकर – ९९६७५ ९५१३७**

## विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा संघातर्फे सत्कार

नेहमीच्या प्रथेनुसार यंदाही २९ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात २०२५ ह्या वर्षात विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांना व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना ज्ञातीतर्फे स्मृतिचिन्हे देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल. संबंधित व्यक्तींनी किंवा त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांची संपूर्ण नावे, पत्ता व टेलीफोन नंबर ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत संघाच्या पत्त्यावर पाठवून किंवा टेलीफोनवर कळवून आम्हांला उपकृत करावे.

१ ऑक्टोबर नंतर अशी नावे आल्यास ऐनवेळी ही स्मृतिचिन्हे तयार करणे कठीण जाते याची दखल घ्यावी.


# SHREE HOMOEPATHIC PHARMACY

**Wholesale & Retail For : Genuine Indian & Imported Homoepathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**

**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

# संपादकीय

एप्रिल २०२६ मध्ये भरगच्च कार्यक्रम झाले. १२ एप्रिलचा रविवार ठाणे मंचने गाजवून टाकला.

शांता शेळके, बा. भ. बोरकर, मंगेश पाडगांवकर यांच्या गीतांना ठाणे मंचच्या कलाकारांनी गाऊन योग्य न्याय दिला. त्या आधी श्रीमती मीरा प्रभू वेर्लेकरांच्या 'शब्दसरिता' ह्या नव्या पुस्तकाचा प्रकाशित सोहळा श्रीमती हिमांगी नाडकर्णी, (अध्यक्ष –एन्.के.जी.एस.बी. बँक) यांच्या हस्ते थाटात पार पडला.

त्या पाठोपाठ १३ एप्रिल रोजी रामेश्वर मंदिराच्या हॉलवर संस्कृत भारतीच्या १० दिवसांच्या शिबीराचा समारोहपर कार्यक्रम पार पडला. त्यासाठी अस्मादिकांना त्या समारंभाचे 'प्रमुख पाहुणे' म्हणून बोलावण्यात आले. संस्कृतमधून भाषणे झाली. संवाद झाले व गीत तसेच श्लोकही म्हटले गेले.

आणखी अत्यंत महत्त्वाची बातमी म्हणजे डॉ. सलोनी वाघ (डायरेक्टर सुप्रिया लाईफ सायन्सीस) ह्यांना राष्ट्रपती भवन मध्ये भोजनाचे निमंत्रण होते. त्यावेळी स्वत: राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, वियतनामचे अध्यक्ष तो लाम, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व इतर मंत्रीगण तसेच भारताचे उद्योगपती उपस्थित होते. भोजनाला डॉ. सलोनी यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बाजूला बसण्याचा मान मिळाला. ही आम्हा कारवारकर ज्ञातिबांधवांसाठी गर्वाची व मानाची बाब ठरावी.

आज आम्ही एका ज्वलंत विषयावर लिहिणार आहोत. आता आपल्या ज्ञातीतील जेष्ठ नागरिकांनी त्यांच्या भोवतीच्या ''सायबर सापळ्या''बद्दल जागरूक रहाणे गरजेचे झाले आहे. ऑनलाईन फसवणूक होणार नाही याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. आज अनेक आपले जेष्ठ नागरिक तांत्रिक बाबींमध्ये कमी पारंगत असल्यामुळे 'डिजीटल अरेस्ट' सारख्या फसवणुकीचे सहज बळी ठरत आहेत. ही चिंताजनक बाब आहे. आपल्या अनेक जेष्ठांच्या घरातील मुले अमेरिका, युरोपमध्ये मुक्काम करून आहेत. वृद्ध आई वडील इथे एकटेच असून मुलांनी बँकेत पाठवलेल्या पैशावर गुजराण करून आहेत. हे बँकेचे व्यवहार करताना आपण 'सायबरच्या सापळ्या'त अडकत नाही आहोत ना याची खबरदारी घेणे अनिवार्य आहे. जेष्ठ नागरिकांनी अनोळखी कॉल्स व संदेशांपासून सतर्क राहणे गरजेचे आहे, यासाठी कुटुंबीयांच्या येथील जवळच्या तरुण नातेवाईकांनी त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

एरवी हुशार व सूज्ञ असलेले जेष्ठ नागरिकच जास्त करून सायबर गुन्हेगारांचे बळी पडत आहेत. याबाबतच्या बातम्या रोजच्याच झालेल्या आहेत. गुन्हेगार इतक्या वेगाने पैसे इकडून तिकडे फिरवतात की, शोध लागणे कठीण होऊन बसते. यासाठी सुरुवातीपासून स्वत:च सतर्क राहणे फार गरजेचे आहे हे लक्षात ठेवा. तरी गुन्हा झाल्यास सायबर ब्रँच नंबर १९३० वर पोलिसांशी संपर्क साधावा. धन्यवाद.

– प्रसाद कसबेकर

## प्रकाश झोत – १



(From our Karwar GSB community
**Dr. Shailendra S. Telang** Consultant)

Osteoarthritis (OA) is the most common form of arthritis and a leading cause of chronic pain and disability in India. With increasing life expectancy, Sedentary lifestyles, obesity, and joint overuse, the prevalence of OA has risen sharply. Studies indicate that 22-28% of Indian above the age of 45 show clinical or radiological evidence of OA, with the knee being the most commonly affected joint. When OA results in persistent pain, significant restriction of mobility, and a poor quality of life despite optimal nonsurgical treatment, joint replacement surgery becomes a well established option.

Dr. Shailendra S. Telang, (Consultant joint replacement surgeon, Director orthopedic Services, Odyssey clinic, Borivali, Seatherny Hospital) tells "A closer look at how the right treatment approach in joint care supports long-term ability at every stage while improving quality of life.

Dr. Shailendra S. Telang is son of Shree Shivanand Telang and Shrimati Sushanta (Pushpa) S. Telang from Karwar.

## प्रकाश झोत–२



Dr. U. Sandhya Shenoy (Material Science Prof. and Principal research scientist at Sriniwas University)

She ranked in the world's top 2%, scientists by Stanford University for the third consecutive year.

A proud moment for the G.S.B. community as her remarkable research and contributions have earned GLOBAL recognition.


Her inspiring journey stands as a guiding light for aspiring young minds.

## प्रकाश झोत–३



Sadhavi Satish Sail, born in KARWAR, was crowned Femina Miss India World 2026 on April 18th 2026 in Bhubaneshwar, Odisha. The 61st edition winner is the "DOUGHTER OF KARWAR SOIL."

Now, she will represent India at the 75th MISS WORLD Pageant.


www.kccgoa.in
कोमल हिरवी तृणपाती ही
अलगद झुलवी सर्वांग,
कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
उजळून जाई आनंद
अप्रतिम निसर्गाने नटलेलं
सुखसमृद्धी
मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर,
मंगेशी, फोंडा- गोवा
मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मन:शांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.
फ्लॅट्स् उपलब्ध: 1 रुम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के
प्रोजेक्ट मान्यता: गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्य: नामवंत वित्त संस्था
a Project by:
कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी
मुंबई ऑफिस: श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजुला,
सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि: 2683 3841/47/72. मोबा: 98336 36451
फॅक्स: 2683 3872 ई-मेल/ kunalconstructiongoa@yahoo.in
गोवा ऑफिस: टी- 1, रॉयल हाउस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321
गोवा साईट: 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

# 'कोंकणी आमगेली मॉगाची'

कोकणी भाषा आम्हा सारस्वतांची भाषा हे सांगताना आम्हा सर्वांनाच अभिमान वाटतो, मन भरून येतं. पण आजच्या पिढीला मात्र या कोकणी भाषेचा विसर पडलाय. नवीन पिढी या भाषेला दुरावलीय ही खंतही वाटते. खरंतर हा आहे काळाचा महिमा, काळाच्या ओघाने हे घडतंय. नाईलाज आहे. पण खर सांगते, कधी कोकणी गीत मात्र या तरुणांच्या कानी पडलं की त्यांचा आनंद विचारूच नका. हा माझा अनुभव आहे. आनंदी लय आणि धुंदी त्यांच्या मनाला मोहून टाकते. ही गाणी जशी गोडव्याने भरलेली आहेत तसं संस्कृतीच प्रतीक दाखवणारीही आहेत. काही गाण्यांमध्ये मातीचा सुगंध, तर काही गाण्यांमध्ये निसर्गाचं दर्शन, तर काहींमध्ये रोजच्या जीवनातील विनोदही अनुभवायला मिळतात. मनाला सुखावणारे, सणांचा गोडवा वाढवणारे. 'मांडो' (मांडव) हे तर गोव्यातील वैशिष्ट्यपूर्ण संगीत. ऐकायला मधुर, मनाला भिडणारं. ही गाणी लग्नाचं वातावरण आनंदी आणि मंगलमय बनवतात. यात पारंपारिक लग्नाचे विधी हळद, वऱ्हाड येताना गायली जाणारी लोकगीत समाविष्ट आहेत. त्यामुळे कोकणी गाणी ही पिढ्यान पिढ्या टिकून राहिली आहेत. एवढंच नाही तर त्यांचे भविष्यही उज्वल राहील यात काहीच शंका नाही.

कोकणी भाषा ही संस्कृतपासून विकसित झालेली प्राचीन भाषा वाटते. मराठीच्या जवळ तरीही स्वतंत्र भाषा मानली जाते हे याचे विशेष. देवनागरी लिपीत लिहिली गेली तरी गोव्यात मात्र रोमन लिपीचा वापर केलेला दिसतो. प्रदेशानुसार त्याच्या अनेक बोली आहेत – गोमंतकीय, कारवारी, मालवणी, मंगळुरी, कोची. या भाषेला गोमंतकीय पोर्तुगीज राजवटीचा आधार आहे त्यामुळे खूप पोर्तुगीज शब्दांचा प्रभाव दिसतो. कोकणी भाषा ही स्वतंत्र की मराठीची बोली ही चर्चा तर नेहमीच चालू असते तरी सुद्धा दोन्ही भाषा भिन्न आहेत एवढं मात्र खरं. दोन्ही भाषा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक धाग्यांनी एकमेकांशी निगडित आहेत. कोकणी भाषेला निसर्गाची लय आहे, गोडवा आहे आणि पोर्तुगीजांशी जवळीक आहे. आणि ज्ञानेश्वरीशी जवळचं नातं आहे. आणि यामुळेच ही आपल्या सर्वांच्या मनावर बिंबली गेली आहे. ज्ञानेश्वरी तसंच ज्ञानदेवांच्या 'अमृतानुभव' या मराठी ग्रंथात बरेच कोकणी शब्द वाचायला मिळतात हे या भाषेचे वैशिष्ट्य.

कर्नाटकातील श्रवण बेलगोला हे ऐतिहासिक जैन तीर्थक्षेत्र. येथे बाहुबली गोमटेश्वर ही मूर्ती प्रसिद्ध आहे. येथे शके ९०५ चा 'श्री चामुंडराये करविले' हा शिलालेख आहे. यामध्ये कोकणीचा प्रभाव दिसून येतो असे इतिहास सांगतो. कोकणी भाषा एकूण १००० वर्षांपासून प्रचलित आहे हे स्पष्ट होते. तरीसुद्धा या आपल्या भाषेला भाषा म्हणून दर्जा मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला यासारखे दुःख नाही. कोकणी भाषेचा विकास करण्याचं काम कृष्णराज श्यामा यांनी केलं. ते श्री शांतादुर्गा मंदिरात काम करत असत. त्यांनी कोकणी भाषेत उपलब्ध असलेलं पहिलं लिखाण लिहिलं. पंधराव्या शतकात यांनी लिहिलेलं महाभारत आणि रामायण हे गद्य लिखाण. हा महत्त्वाचा कोकणी मराठी भाषेतील इतिहासातील दुवा आहे.पद्मश्री बा. भ. बोरकर हे गोव्यामधील मराठी कोकणी कवी होते. निसर्ग सौंदर्य, प्रीती आणि आनंदवादी कविता लिहिण्याचं कसब त्यांच्याकडे होतं. त्यांनी या कोकणी भाषेला सुंदर वळण लावलं. भोवतालच्या सृष्टीला हाक घालत आपल्या कवितांनी वाचकांना भुरळ पाडली. बाकीबाब यांनी भगवत गीतेचे श्लोक अनुवादित केले हे बऱ्याच जणांना ठाऊक नसेल. त्याला ते 'कोकणी समश्लोकी' असं म्हणत. याला ''गीताय'' हे नाव त्यांनी दिलं होतं. डाव्या पानावर गीतेचा मूळ संस्कृत श्लोक व उजव्या पानावर कोकणीमधील गीता समजू शकते यातच बा.भ. बोरकरांचं लेखणी सामर्थ्य दिसून येतं, तसंच कोकणी भाषेची महतीही कळते.

बा.भ. बोरकरांनी आपल्या कोकणी कवितेत मोजक्या शब्दात जीवनाचं सार सांगितले आहे. वाचा हं ही कविता!

(बाकी पुढील पानावर)

येतना तू वे हाडले कीते?            वतना किते व्हरतलो?
पोटलो तुजो खाटलो तुजो,          हांगचो हांगा उतरलो!!
हीच आहे कोकणी भाषेची किमया!!

लेखिका : सौ. शोभना रविंद्रनाथ कसबेकर, माहीम मोबाईल : ९८३३६०४३८८

## नीता वागळे : संघर्ष आणि निःस्वार्थ प्रेमाचे एक उदाहरण

आजोबांच्या स्वप्नात त्यांची आई नेहमी येत असल्यामुळे त्यांच्या विनंतीचा मान राखून १६ जुलै १९५१ ला जन्मलेल्या या तान्हा मुलीचे नाव शांता ठेवण्याचं ठरवले. तेव्हा ते गिरगावातल्या एका छोट्याशा चाळीत रहात होते. लहानपणापासून गुटगुटीत असल्याने सगळे तिला 'बेबी'च म्हणत असत आणि पुढे सुद्धा तिच्या खऱ्या नावापेक्षा हेच नाव जास्त प्रचलित झाले. ७० वर्षांची झाली तरीही सर्वांसाठी ती 'बेबी'च होती.

गिरगावातल्या राममोहन मराठी माध्यम शाळेत शिकलेली शांता लहानपणापासून अभ्यासू होती. तिला मासे खाण्याची खूप आवड होती. अगदी सकाळच्या चहापासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत तिला जरी मासे दिले तरी ती आवडीने खात असे. विल्सन कॉलेजमधून विज्ञान शाखेत पदवी प्राप्त केल्यानंतरही तिचे तरुणपण फक्त संघर्ष, कष्टांनी भरलेले होते. B.Sc. होऊनही लवकर नोकरी मिळविण्यात तिला अपयश आले आणि त्यामुळे तिचे लग्नही लांबले.

१९८० साली त्यांचे कुटुंब गिरगावातून चार बंगला अंधेरी पश्चिम इथे राहायला गेले. आणि अखेर १९८१ मध्ये तिला तिचा जोडीदार मिळाला. ऑक्टोबर १९८१ शांता कुलकर्णी ची नीता वागळे झाली. हे जोडपे बोरिवली पूर्वेकडील नेन्सी कॉलनीत राहायला गेले आणि ४ मे १९८३ रोजी माझा जन्म झाला. एकीकडे मी हॉस्पिटलमध्ये होतो आणि त्याच वेळेला माझे वडील टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये कॅन्सरवर उपचार घेत होते. त्यांना कॅन्सर आहे हे खूप वर्ष आधीच कळले होते पण आता तो तीव्र झाल्यामुळे ते आपल्या आयुष्याचे काही अखेरचे महिने मोजत होते. आपल्या बाळंतपणानंतर तीन महिन्याच्या आत नीता दोन हॉस्पिटलमध्ये एकटी धावपळ करत होती. मी बरा झालो पण माझे वडील मार्च १९८४ मध्ये स्वर्गवासी झाले.

ना नोकरी, ना काही स्थावर मालमत्ता, ना काही विशेष जमा पुंजी, अशा परिस्थितीमध्ये एक निष्पाप ३२ वर्षाच्या विधवेला आपल्या १० महिन्याच्या तान्ह्या मुलाच्या भविष्याबद्दल विचार करण्याशिवाय दुसरा काही पर्याय नव्हता. तिची आई, मोठी बहीण, भाऊजी आणि धाकटा भाऊ तिच्या पाठी खंबीरपणे उभे राहिले व तिला आवश्यक असलेला मानसिक आधार दिला. आता नीताच्या आयुष्याचे एकमेव ध्येय होते तिचा १० महिन्यांच्या मुलाचे संगोपन, काही महिन्यांनंतर तिला पुनर्विवाहाचे प्रस्ताव येऊ लागले. कुटुंबातील सदस्यांनी तिला तिची इच्छा काय आहे असे विचारले. पण माझ्यासाठी सावत्र वडीलांचा धोका ती पत्करू इच्छित नव्हती.

ऑक्टोबर १९८४ मध्ये NKGSB बँकचे तत्कालीन उपाध्यक्ष S.R Borkar यांनी इन्टरव्ह्यू घेतल्यानंतर तिची स्टेनोग्राफर म्हणून नियुक्ती करण्यात आली व २ नोव्हेंबर १९८४ पासून ती बँकेत रुजू झाली.

लहान असताना भी मम्मीला त्रास कमी दिला नाही. शाळा आवडत नसल्याने मम्मीने सोडलं तरच मी शाळेत जाईन असा हट्ट मी माझ्या आजीकडे करत असे. त्यामुळे मम्मीला दुपारी दगदग करून

गिरगावातून चार बंगला येथे फक्त मला शाळेत सोडण्याकरीता यावं लागायचं आणि त्यानंतर बँकेत परत धावत जावं लागे. तिचा रोजचा दिनक्रम म्हणजे सकाळी ०५.३० वाजता उठणे, स्वयंपाक करणे आणि स्वयंपाक करताना मला स्वयंपाकघरातील प्लॅटफॉर्मवर बसवून माझा अभ्यास घेणे, सकाळी ८.०० वाजता ऑफिसला घाईघाई करून पोचणे आणि दुपारी १२.३० वाजता मला शाळेत सोडण्या करीता धावत पळत पुन्हा घरी येणे आणि दुपारचे जेवणानंतर पुन्हा गिरगाव ऑफिसला जाणे. रात्री ०८.३० वाजता परतल्यानंतर माझ्या दिवसाच्या शाळेचा गृहपाठ करून घेणे. ती काही सोन्या चांदीचा चमचा घेऊन जन्माला आली नव्हती, पण मर्यादित साधन संपत्ती असतानाही तिने मला चांगल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठवण्याचे ठरवले. माझ्या वयोगटातल्या मित्रांमध्ये मी एकटा पडू नये याची ती नेहमी काळजी घेत असे. त्यामुळेच दिवाळीचे फटाके असो किंवा होळीचे रंग आणि पिचकारी नेहमी ती मला आणून देई म्हणजे मी माझ्या मित्रांबरोबर खेळू शकेन. शाळेत सर्वसाधारण विद्यार्थी असल्यामुळे मला दहावीत चांगले गुण मिळावेत यासाठी तिने शक्य तितके प्रयत्न केले. पण मला सरासरी गुण मिळाल्याने ती निराश झाली आणि आता तिला सतत माझ्या भविष्याबद्दल खूप चिंता लागून राहायची. सुदैवाने म्हणा किंवा तिच्या प्रार्थनेमुळे म्हणा मला भवन्स कॉलेज अंधेरीमध्ये कॉमर्सला प्रवेश मिळाला. T.Y.B.com. ला मी कॉलेजमधून पहिला आलो. पण नुसतं B.Com. डिग्री वर ती खुश नव्हती. तिला मला CA आणि CS झालेलं बघण्याची इच्छा होती.

ऑगस्ट २००८ मध्ये मी CA झालो आणि तिचं आयुष्यभराचं स्वप्न पूर्ण झालं. 'देव पावला' या शब्दात तिने माझं अभिनंदन केलं. माझ्या शिक्षणाबरोबरच तिचं अजून एक स्वप्न होतं ते म्हणजे स्वतःचं एक 2BHK घर असावं. वर्षानुवर्ष कठीण परिश्रम केल्यानंतर मार्च २०११ मध्ये हे स्वप्न पूर्ण झालं. तिने स्वतः कमावलेल्या पैश्यातून अंधेरी लोखंडवालामध्ये 2BHK फ्लॅट घेतला. 1RK खोली घरापासून 1BHK आणि आता 2BHK हे सर्व तिने एकटीने स्वतःच्या बळावर केलं. जुलै २०११ मध्ये तिचा NKGSB बरोबरचा २७ वर्षांचा प्रवास पूर्ण करून ती निवृत्त झाली. ती नेहमी म्हणत असे की NKGSB मुळे मी अक्षरशः शून्यातून इथे पर्यंत आले, नाही तर मला हे शक्य झाले नसते.

नोकरी आणि माझ्या जबाबदारीमुळे तिला तिची फिरण्याची आवड जोपासता आली नाही. ती सदैव म्हणत की मला लहान आणि तरुणपणी कुठेही फिरण्याची संधी मिळाली नाही पण निवृत्तीनंतर मी जग फिरणार्. देवाच्या कृपेने तिला हे स्वप्न पूर्ण करता आलं आणि निवृत्तीनंतर भरपूर देश फिरू शकली. ती फक्त स्वप्न बघत असायची आणि तिला असं वाटायचं की हे या जन्मात तरी शक्य नाही. तिला तिच्या भाचीच्या ५० व्या वाढदिवसासाठी गोव्याला जाण्याची इच्छा होती आणि म्हणून आम्ही ऑक्टोबर २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात दोघेही गोव्याला गेलो होतो. पण हा प्रवास तिच्या आयुष्यातला शेवटचा मुंबई बाहेरचा प्रवास ठरला.

१४ नोव्हेंबर २०२५ च्या संध्याकाळी तिने मला फोन करून विचारले की तू जेवायला रात्री मासे खाणार का नाही. जेवण केल्यानंतर ती तिच्या आवडीचे मराठी वृत्तपत्रातले कोडे सोडवत बसली होती आणि मग रात्री १०:३० वाजता झोपायला गेली. झोपण्याच्या आधी तिने मला सांगितले की उद्या आपल्याला बँकेत Life Certificate देण्यासाठी सकाळी जायचं आहे. तिने बँकेला देण्यासाठी Aadhar card आणि PAN card स्वतः काढून ठेवले होते. १२:३० वाजता तिला जेव्हा जाग आली आणि तिने पाहिलं की मी अजून जागा आहे तेव्हा ती मला ओरडली आणि मला झोपायला जायला

सांगितले. मी तिच्याच खोलीत तिच्या बाजूला झोपायला गेलो. मी झोपायला गेल्यावर तिने मला 'तुझ्या खोलीमधून अजून एक पांघरूण आणू का?' असंही विचारलं. मी नाही म्हटल्यावर goodnight म्हणून आम्ही दोघे झोपलो.

१५ नोव्हेंबर २०२५ ला पहाटे ५:४५ च्या सुमारास उठून ती टॉयलेटला जाऊन आल्यानंतर परत झोपली. एरवी कुंभकर्णासारख्या झोपणाऱ्या मला त्यादिवशी कसं कोण जाणे, पण सकाळी अचानक ६:०० वाजता जाग आली आणि असं वाटलं की कोणी तरी मला झोपेतून जागं करतो आहे. दचकून मी जागा झालो आणि मम्मी असं ओरडून तिला हाक मारली. बाजूला बघितले तर ती बेडच्या अगदी कडेला झोपलेली होती. खाली पडेल या भीतीने मी तिला आतमध्ये सरकायला सांगितले पण तिने काही उत्तर दिले नाही. गाढ झोपली आहे असं समजून मी तिला आतमध्ये सरकवण्याचा प्रयत्न केला आणि त्या क्षणी एक विचित्र आवाज तिच्या नाकातून आला आणि कसं कोण जाणे मला त्यावेळेला वाटलं की हा तिच्या आयुष्यातला शेवटचा श्वास आहे. शेजाऱ्यांना बोलवून घेऊन मी पाच मिनिटात कोकिलाबेन रुग्णालयात धाव घेतली आणि तिला वाचवण्यासाठी डॉक्टरांना विनंती केली. पण डॉक्टरांनी काही वेळानंतर सांगितले कि तिला रुग्णालयात घेऊन येण्याच्या आधीच तिचा मृत्यू झाला आहे.

ज्या आईने मला जन्म दिला, जिने तीन महिन्याच्या तिच्या तान्ह्या बाळाला मृत्यूच्या तावडीतून बाहेर काढले, जिने संपूर्ण आयुष्य माझ्यासाठी वेचले. तिला वाचवण्यासाठी फक्त एका हाताच्या अंतरावर असुनही मी काहीही करू शकलो नाही याची खंत मला आयुष्यभर राहील. परत तिने मागे सोडलेला वारसा आणि तिने जपलेली मुल्ये मी पुढे नेण्याची आशा करतो. तिच्याकडे असलेल्या १०% गोष्टी जरी मी आचरणात आणू शकलो, मम्मीने आयुष्यात किती भूमिका बजावल्या आहेत हे पाहून मला आश्चर्य वाटते. आताही मला तिचे अस्तित्व सतत माझ्या आजूबाजूला जाणवत राहते आणि तिच्या आवडत्या अभिनेत्रीच्या म्हणजेच साधनाच्या गाण्यांचे बोल माझ्या कानात घुमत राहतात...'तू जहाँ जहाँ चलेगा, मेरा साया साथ होगा'.

–लेखक : अमेय वागळे. मोबाइल: ९८९२९०८५२७

## " Shreya's High Performance"



**Shreya Rajendra Kulkarni**

(Great grand daughter of
Seth Shantaram Kulkarni)

School : Dr. Sarvepalli Radhakrishnan Vidyalay, Malad

Staying at : Goregaon

Native place : Karwar

Achievement : Scored 96.2% in Std 10 SSC Board Exams

**Smt Prabha and Shri Manohar Palekar's Grand Daughter.**



**Shamika Durgesh Palekar**

डोंबिवली स्थित कु. शमिका दुर्गेश पालेकर, ओंकार इंटरनॅशनल स्कूलची विद्यार्थीनी हिने यंदा दहावीच्या परीक्षेत (ICSE) ९८% गुण मिळवून उज्ज्वल यश संपादन केले.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे कु. शमिकाने अभ्यासाव्यतिरिक्त कथ्थक नृत्यातही विशेष प्रावीण्य मिळवले आहे. शमिका ही डोंबिवलीतील मंजिरी नृत्यकला मंदिर ह्या कथ्थक शाळेची विद्यार्थिनी आहे व तिला गुरू डॉ. वैशाली दुधे यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शमिकाने विविध नृत्य महोत्सव आणि स्पर्धांमध्ये प्राविण्य प्राप्त केले आहे.

१. नृत्योत्सव – राष्ट्रीय स्तरावरील नृत्य स्पर्धा – वैयक्तिक सादरीकरण (कथ्थक) प्रथम क्रमांक

२. परंपरा– डॉ. मंजिरी देव आणि श्री गणेशमूर्ती कलामंदिर आयोजित कार्यक्रमात सहभाग.

३. डोंबिवलीकर कथ्थक महोत्सवात सहभागी आणि सादरीकरण.

४. श्री श्री रवी शंकर ह्यांच्या आर्ट ऑफ लिव्हिंग येथे कला सादरीकरण करण्याची संधी मिळाली.

५. नॅशनल सेंटर ऑफ परफॉर्मिंग आर्टने आयोजित केलेल्या मुद्रा डान्स फेस्टिवलमध्ये नृत्य सादरीकरण करण्याची संधी मिळाली.

दहावीचे व्यस्त वेळापत्रक आणि कथ्थक नृत्याची आवड ह्याचा यथायोग्य मेळ साधत शमिकाने हे यश मिळवले आहे. कौतुकाची बाब म्हणजे तिने विशारद परीक्षासुद्धा ह्याच वर्षी दिली.

***शमिकाचे हार्दिक अभिनंदन.***

## Dr Sunil Nadkarni

The grandson of Ganpat Master of Sadashiv Gadh High School, is a renowned spine specialist surgeon from our community and is affiliated with Deenanath Mangeshkar Hospital and many other hospitals in Pune.

He resides in Ankur Bungalow, Shanta Society, off Senapati Bapat Road. His father, Manohar Ganpat Nadkarni, began working in the A-G Office in the late 1950s and was posted to the United Kingdom from 1958 to 1963. He retired as VP, Finance, and Company Secretary from Indian Card Clothing Company, Pune, and has been settled in Pune since 1970. His mother, Shalini, was an M.Sc. (London) in Organic Chemistry. She hailed from the Muzumdar family. She worked as a Lecturer in Ruia College, Mumbai, until 1970. And thereafter in SP College, Pune, until her retirement in 1995. Together after retirement, they established their own industrial and food chemical analytical laboratory, called Accurate Analytical Laboratory. Following their demise, the laboratory is now looked after by their daughter, Mrs Sharmila Kanvinde. Sharmila's husband, Dr RB Kanvinde, MS, FRCS, retired as a consultant orthopaedic surgeon in the UK after working there for over 40 years. Their daughter, Natasha, is a qualified paediatrician from the UK.

Sunil's wife, Dr Sanyogita Nadkarni, is a Psychiatrist trained in the UK and presently working as a Child and Adolescent Psychiatrist in Pune. Their daughter, Dr Avani, is an MD in anaesthesia and is presently working in Pune. Sunil's maternal grandfather and uncle were partners of the Borkar & Muzumdar firm of auditors, which audited our Sangh and Society accounts until 2022-23, at no cost.

Dr. Sunil was born in India and attended King George School, Dadar, for his schooling. He was a merit holder in SSC board. He completed his MBBS and MS (Ortho) from B. J. Medical College, Pune. He thereafter went to the UK for further training. He completed his FRCS in Edinburgh and his MCh (Orth) in Liverpool, UK. He specialised in Spine surgery both in the UK and Sydney, Australia.

In 1999, inspired by BKL Walawalkar Hospital in Derwan in rural Konkan, he decided to return to India. Since his return, he has been working at both the Pune hospitals and the rural hospital in Derwan. He is socially aware and strives to utilise his knowledge and skills to assist patients from all socioeconomic backgrounds. He has been involved in the promotion of a stitch less method under local anaesthetic, which allows the patient to go home the next day after surgery. Furthermore, Dr Sunil has been involved in tissue culture research whereby healthy cells are recovered from usually wasted disc fragments and could potentially be returned to the same patient.

One of the striking chance findings in the course of this research is that the cells may perhaps aid in neurological recovery. This is still under investigation. Typically, tissue culture work requires fetal bovine serum, which India imports at a high cost. At Derwan, the team has successfully grown cells by substituting fetal bovine serum with a processed platelet concentrate, which is wasted in the Blood Bank. This has potential value in import substitution. Wishing him many more success in his life.

By Waman Nadkarni - ९८६९४१६०२३

## एज्युकेशन सोसायटी – गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षिसे

दरवर्षी ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठी बक्षीसे दिली जातात. बक्षीसाची पात्रता पुढीलप्रमाणे

| परीक्षा | | किमान पात्रता |
|---|---|---|
| दहावी | | ८०% |
| बारावी | | ७५% |
| – | विज्ञान (वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला असेल तर अर्जात तसे नमूद करावे.) | ७५% |
| | वाणिज्य | ७०% |
| | कला | ६५% |
| पदवी व सरकारमान्य डिप्लोमा | | ६०% |
| एम.ए.एम.कॉम., एम.एस्सी. पीएच.डी, वैद्यकीय क्षेत्रातील पदवी एम.बी.ए., सी.ए., कॉस्ट अकौंटस्, कंपनी सेक्रेटरी, पदव्युत्तर डिप्लोमा इत्यादी | | उत्तीर्ण |
| परदेशांत घेतलेली पदवी | | ए ग्रेड |

तसेच किमान राज्य पातळीवरील क्रीडास्पर्धेत ज्यांना पदके मिळाली असतील किंवा जे स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाले असतील तर संबंधितांनी त्याचाही तपशील पाठवावा. कार्यकारिणी अशाही अर्जाचा विचार करील.

**अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख ११ ऑक्टोबर २०२६**

विद्यार्थ्यांनी गुणवत्ता पत्रिकेची प्रत (झेरॉक्स), टेलीफोन नंबर, **Email** व संपूर्ण पत्ता **The NKGSB Ind & Education Society Laxmi Sadan, 361, V. P. Road, Mumbai - 400 004** या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

* विद्यार्थ्याच्या वडिलांचे मूळ गांव उत्तर कानडांत असावे व ते स्मार्त कवळे मठानुयायी असावेत किंवा आई माहेरच्या तिथल्या असून सारस्वत पोटजातीतील गृहस्थाशी विवाहबद्ध असणाऱ्या पाहिजेत.
* बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी बी.बी.एस., जर्नेलिझम किंवा बी.कॉम. शाखेत प्रवेश घेतल्यास तसे नमूद करावे.
* ज्या डॉक्टर्सनी एम.एस. किंवा एम.डी.साठी प्रवेश घेतला आहे, त्यांनाही काही पुरस्कृत बक्षिसे आहेत. संबंधितांनी याचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावा.
* गेल्या वर्षी काही परीक्षांचा निकाल उशीरा लागला होता. तेव्हा संबंधित गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांनीही अर्ज पाठवावे.

## वळणदार शब्दसरिता – लेखिका : शैलजा नाडकर्णी

ललित साहित्यात प्राविण्य मिळवलेल्या मीराताई प्रभुवेर्लेकरांचा मी एकेरीत परिचय करून देते. आपण कोकणी माणसं प्रेमाच्या, अपुर्बायेच्या माणसाला याच पद्धतीने संबोधित करतो. त्यानुसार खुद्द कारवारातच जन्मलेली मीरा तेलंग रावबहादुर तेलंगांची नात. सर्व अर्थाने समृद्ध अशा घरात मिळालेले संस्कार घेत कारवारातच लहानाची मोठी झाली. कारवारमधली हिंदू हायस्कूल ही शाळा त्याकाळात ऋषीतुल्य अशा शिक्षकवर्गाने प्रसिद्धीस आणलेली. या शाळेतली विद्यार्थिनी म्हणून तिथे शिक्षण घेतलं आणि कारवारातल्याच कॉलेजमध्ये पदवी मिळवल्यावर आपल्याच शाळेची परंपरा राखत पाच वर्ष या शाळेत विद्यादानही केलं. एकंदरीत तिची जडणघडणच कारवारमध्ये झाली. अशा सर्व संस्कारांनी समृद्ध होऊन मीरा, लग्न झाल्यावर मीरा प्रभू–वेर्लेकर होऊन गोयकार झाली. मीरेची मीराबाय झाली.

गोयकरांची रसिकता, कलासक्तपणा, साहित्यिक समृद्धी या सर्व वैभवाचा तिने आपले उद्योजक पती निशीथ प्रभू–वेर्लेकर यांच्या समवेत उपभोग घेतला. तिचं अनुभव विश्व विस्तारित होत गेलं. वयाच्या चाळीशीपर्यंत गृहिणी म्हणून प्रपंचाची जबाबदारी तर यशस्वीपणे पार पाडलीच; पण हे करत असतानाच नामांकित साहित्यिकांच्या सहवासात मिळालेलं मार्गदर्शन आणि उत्तेजन यामुळे तिने स्वतःच ललित–लेखिका म्हणून कधी प्रसिद्धी मिळवली हे कळलंच नाही. आजवर तिच्या लेखांचे सहा संग्रह गोव्यात पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले आहेत. हा सातवा संग्रह तिच्या माहेरच्या मायेच्या माणसांपुढ्यात प्रसिद्ध होतो आहे. ''वा! मीरा, तू होड, मनीस जाले मगो! अपूर्बाय दिसता गो तुगेली.' या शब्दांनी 'गुणकुळे' होण्याचा आनंद मीराताईला आपल्या कारवारकरांच्या सहवासात नक्कीच मिळणार म्हणूनच तर आपल्या NKGSB ठाणेमंचच्या पुढाकाराने 'शब्दसरिता' या सातव्या संग्रहाच्या प्रकाशनाचा सोहळा आयोजित केला होता.

या सर्व सोहळ्यात 'आमगेलो मनीस' डी. एन. नाडकर्णी यांनी स्वत: येऊन मीराताईची पाठ थोपटून कौतुके केल्याची उणीव मात्र आपल्याला नक्कीच जाणवली.

'शब्दसरिता' हे पुस्तकाचं शीर्षकच कधी झुळुझुळु वहाणाऱ्या तर कधी सुरेखसं वळण घेऊन चकित करणाऱ्या नदीसारखं आनंददायी लिखाण यात असणार हे दाखवून देतं.

मीराताईसारखंच सुबक चणीचं, सुटसुटीत असं पुस्तक हातात घेतल्यावर मुखपृष्ठ आधी लक्ष वेधून घेतं. शब्दांची सरिता काळजाकडून कागदाकडे वाहून नेणारी सोनेरी लेखणी, तिच्यावरची बोटांची सहज पकड, वेगवेगळ्या भावमुद्रिकांनी अलंकृत असा लेखिकेचा दुसरा हात पुढ्यातल्या कागदावर ठामपणे स्थिरावलेला दिसतो. आणि वळणदार अक्षरात नेमक्या शब्दात उमटलेले लेखिकचे मनोगत दर्शनातच पुस्तकाचं अंतरंग दाखवून देतं. हे मुखपृष्ठ मीराताईंचा नातू तियान पराग पै याने आपल्या आजीसाठी किती कल्पकतेने साकारले आहे याबद्दल त्याचं कौतुक करावं तेवढं थोडंच.

शब्दसरिता हा ललित लेखांचा संग्रह मीराताईच्या आजवरच्या आयुष्यातल्या अनुभव विश्वाचे दर्शन घडवतो. वयाच्या सत्तरीनंतरची पिढी. तिने देशाच्या स्वातंत्र्याच्या उदयापासून ते आतापर्यंतचे वेळोवेळी होणारे रहाणीमानातले, विचारातले, सामाजिक, राजकीय आणि मुख्य म्हणजे तंत्रज्ञानातले

आश्चर्यकारक बदल जवळून पाहिले आहेत. त्यांचा अनुभव घेतला आहे. हे सर्व अनुभव मीराताईने आपल्या पुढे मांडले आहेत. तेही मोठेपणाचा आविर्भाव कुठेही न आणता अगदी मित्रमैत्रिणींशी गप्पागोष्टी कराव्यात इतक्या सहजपणे, एकीकडे मिश्किल, मर्मविनोदी शब्दातले किस्से, तर एकीकडे आजबाजूला घडत असलेल्या प्रासंगिक गोष्टींनी व्यथित होऊन तर कधी आनंदित होऊन आपल्यालाही म्हणजे वाचकालाही त्यात सहभागी करून घेतलं आहे. प्रत्येक लेखाचं शीर्षकच असं नमुनेदार आहे, की ते पहाताक्षणीच आपली त्या लेखाविषयीची उत्सुकता वाढवतं आणि मग प्रत्यक्ष लेख वाचताना मीराताईचं सहजसुंदर आणि संवेदनाशील व्यक्तिमत्व उलगडत जातं. हेच तर या ललित लेखनाचं यश आहे.

आपल्या सर्वांच्याच मनात आजूबाजूला घडत असलेल्या बऱ्यावाईट घटनांच्या प्रतिक्रिया तात्पुरत्या उमटत असतात. एखादी शेरेबाजी करून आपण त्या विसरूनही जातो. मीराताईने मात्र आपल्या संवेदनाशील स्वभावानुसार या घटनांना, प्रसंगांना निसटायला दिलं नाही, तर घट्ट पकडून ठेवलं आहे. लग्नसमारंभात कुशल फोटोग्राफरचा कॅमेरा सगळीकडे फिरत असतो. आणि तिथले नेमके क्षण टिपून तो फोटोमध्ये म्हणा, व्हिडियोमध्ये म्हणा कायमचे बांधून ठेवत असतो. तशाप्रकारे ही सर्व दृश्यं मीराताईने आपल्या लेखणीच्या जोरावर शब्दबद्ध करून ठेवली आहेत. तिच्याच शब्दात सांगायचं तर काळजातून कागदाकडे वळवली आहेत. तीही आपल्याशी गप्पागोष्टी केल्यागत.

‘राजसा निजलास का रे’ ‘मेघारे मेघा’ ‘आता उरली आर्त विराणी सूरच केविलवाणे लिहिताना लेखिका खरोखरच आर्त, हळवी होते, तर कधी ‘माझ्या बिनलग्नाच्या सवती’ ‘पाऊले चालती' ‘स्मार्ट फोनची ऐशीतैशी’ ‘रे सख्या तुझ्याविणा’ सारख्या स्फुटांनी मिश्किल होते. त्यातला ‘पाऊले चालती’ हा प्रासंगिक लेख तर अफलातून आहे. अगदी पु.लं.ची आठवण करून देतो. ‘कोरोनाकाळातील विवाहांची कहाणी’ या लेखात तर त्या काळात खरोखरीच्या घडलेल्या विवाहसमारंभांची दृश्यं इतक्या बारकाईने टिपली आहेत की भविष्यात तो ऐतिहासिक दस्तावेज होऊन जावा. शिक्षण क्षेत्रातल्या उपक्रमांचं कौतुकभरल्या शब्दातलं निवेदन आहे. तसंच साहित्य क्षेत्रातल्या मीराताईच्या वाटचालीत जागोजागी, दीपस्तंभ होऊन मार्गदर्शन केलेल्या गुरुतुल्य अशा थोर साहित्यिकांच्या सहवासाचं भाग्य लाभल्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली आहे.

याशिवाय ‘कुटुंबव्यवस्थेची मोडकळ थांबणे गरजेचे’, ‘विधवांना यजमानपदाचा मान मिळावा’, ‘पालकहो पाल्यांच्या बाबतीत जागरुक रहा’ यासारखे वेळोवेळी घडलेल्या घटनांनी व्यथित होऊन लिहिलेले लेख आपल्यालाही विचार करायला लावतात. सहभागी करून घेतात.

आता ‘स्मार्ट फोनची ऐशीतैशी’, ‘रे सख्या तुझ्याविना’ हे तर आमच्यासारख्या वयस्कर लोकांची मोबाईल हातात आल्यामुळे झालेली सोय आणि त्याचबरोबर त्यात नव्या नव्या गोष्टींची भर पडत असताना, तरुण मुलांकडून त्या शिकताना उडणारी तारांबळ अगदी जुस्तपणे दाखवली आहे. अशी ही विविध रंगांचे तुकडे जुळवून कलात्मकतेने जमवलेली गोधडी पांघरायला तुम्हा–आम्हांला नक्कीच आवडेल.

मीराताईची ही आनंदमय शब्दसरिता अशीच झुळझुळ वाहत राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

=:=:=:=:=

## ठाणे मंचने आयोजित केलेला पुस्तक प्रकाशन समारंभ व 'सदाबहार' मराठी गीतांचा कार्यक्रम –

(रविवार,१२ एप्रिल २०२६: तेंडूलकर हॉल, कार्यक्रम)

हॉल जवळ जवळ प्रेक्षकांनी तुडुंब भरला होता.

प्रथम सौ. वृंदा पराग पै यांनी गणेश वंदना म्हटली. तसेच निवेदनही सुरेख केले.

त्यानंतर दीप प्रज्वलन प्रमुख अतिथी मा. CA हिमांगी नाडकर्णी अध्यक्ष NKGSB बँक ह्यांनी तसेच इतर मान्यवर श्रीमती शैलजा नाडकर्णी, सुरेश पालेकर व शिरीष वाघ ह्यांनी केले. गोव्याच्या प्रसिद्ध लेखिका मा. मीरा प्रभू वेर्लेकर यांच्या ''शब्द सरिता–काळजाकडून कागदाकडे'' ललित लेख संग्रहाचे प्रकाशन मा. CA हिमांगी नाडकर्णी ह्यांनी केले. मा. शैलजा नाडकर्णी ह्यांनी त्या पुस्तकाचे परिक्षण केले.

मुंबईतील प्रकाशनाचा हा प्रथम कार्यक्रम असल्यामुळे लेखिका म्हणाल्या,''माझा आनंद द्विगुणित नसून त्रिगुणित झाला आहे. ह्या आधी माझे ६ संग्रह गोव्यात प्रकाशित झाले आहेत.'' ह्या संग्रहात २२ लेख आहेत. त्यांना आलेले अनुभव त्यात सांगितले आहेत. मुखपृष्ठ त्यांची मुलगी वृंदा व नातु तियान ह्यांनी सजविली आहे.

मा. मिराजींनी आपल्या पुस्तकाच्या प्रती तेथे उपस्थित असलेल्या सर्वांना मोफत वाटल्या. एका उत्तम निर्मितीबद्दल त्यांचे अभिनंदन. मा. CA हिमांगीताईंनी त्यांना ह्या कौतुकाच्या सोहळ्यात सहभागी केल्याबद्दल आनंद व्यक्त केला व आपल्या वाचनाच्या आवडीबद्दल सांगितले.

दुसऱ्या सत्रात सदाबहार मराठी कवि बा.भ. बोरकर, कवियत्री शांता शेळके आणि कवि मंगेश पाडगांवकर यांच्या गाजलेल्या गाण्यांची मैफल होती. ह्याचे सूत्र संचालन स्वत: मा. मीरा प्रभू वेर्लेकर यांनी केले. गाणाऱ्यांची मैफल होती. गाणाऱ्यांची नावे १) सियारा राव २) मनोज वाघ ३) जयश्री तेलंग ४) डॉ. पूनम दाभोळकर ५) सुचेता सोहनी ६) प्रिया थळी ७) प्रदीप दाभोळकर ८) प्रभात कुलकर्णी ९) प्रिया कुलकर्णी १०) सुवर्णा कुर्डेकर. सर्व गाणी प्रत्येक गाायक, गायिकेने छान म्हटली. तसेच सर्व गायकांनी मिळून जोशात ''सेतू बांधा रे सागरी'' हे गीत म्हटले. सर्व गायकांना व मान्यवरांना ठाणे मंचकडून भेट वस्तू देण्यात आल्या.

दुपारी २.३० वाजता जेवण झाले. भोजनही स्वादिष्ट होते. कार्यक्रम यशस्वी करण्यात सुरेश पालेकर, राजेश दिवेकर व गिरीश रेगे यांचे आभार मानावे तेवढे थोडेच. ह्या कार्यक्रमात ठाणे मंचला खालीलप्रमाणे देणग्या मिळाल्या. त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

१) हेमंत शिवानंद वागळे – रु.३००१ २) डॉ. सदानंद आणि सुहासिनी नाडकर्णी रु. २५००

३) श्री. प्रकाश व श्रीमती जयश्री तेलंग – रु.३०००

४) वैशाली एम्. दडकर रु. ५००० ५) श्रीमती शैलजा एम्. नाडकर्णी रु. १००००

६) NKGSB Bank बॅनर डिस्प्ले–रु. ५०००० ७) शिरीष दीनानाथ वाघ–रु.१००००

धन्यवाद.

उमाकांत का. पालेकर – (मोबा. ८१०८२९६९१२)

(फोटोज् पान क्र. ३१ वर)



डॉ. सलोनी वाघ यांचे राष्ट्रपती भवनात स्वागत

डॉ. सलोनी वाघ, (डायरेक्टर, सुप्रिया लाईफ सायन्सेस) यांनी व्हिएतनामच्या अध्यक्षांबरोबर बोलणी करून व्हिएतनाममध्ये आपल्या प्रोडक्टस् चा झेंडा गाढला! त्यांच्याच भाषेत सांगायचं तर 'आज मी अत्यंत आनंदी आहे कारण राष्ट्रपती भवनात डीनरसाठी मला भारताच्या उद्योगपती म्हणून आमंत्रित केले होते. बाकी सर्व भारतीय उद्योगपती साठीच्या आसपासचे होते, तर एकटी मी डॉ. सलोनी मात्र सर्वात तरुण उद्योगपती म्हणून गाजली.

आपल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी,व्हिएतनामचे अध्यक्ष तो लाम, त्यांचे डेलीगेट्स, आपले मंत्रिमंडळ व इतर उद्योगपती यांच्यासह एकाच मेजावर बसून आम्ही भोजन केले. अभिमानाची गोष्ट म्हणजे मला स्वतः नरेंद्र मोदींच्या बाजूच्या आसनावर डिनरला बसविण्यात आले होते.' त्या म्हणतात, ''Truly unforgettable experience and a moment I will always cherish with immense gratitude.'' त्यांच्या मिटींगची व्हिडिओ लिंकही माझ्याजवळ डॉ. सतीश वामन वाघ यांनी दिली आहे. डॉ. सलोनी वाघ यांच्यामुळे आम्हाला कारवारी GSB असण्याचा अतिशय गर्व वाटत आहे.

–संपादक.

## ज्ञातिबांधवांना जाहीर विनंती

मुखपत्रिका वाचकांना सुचित करण्यात येत आहे की, जर तुम्हाला –

(१) तुमच्या घरच्या पत्त्यात बदल झाल्याविषयी कळवायचे असेल–(२) संघाला किंवा एज्यु. सोसायटीला काही देणगी द्यायची असेल–(३) तुमच्या कुणा नातलगाच्या वाङ्‌निश्चय किंवा विवाहा संदर्भात कळवायचे असेल–(४) तुमच्या नात्यातील / ओळखीचे / जवळ रहाणारे (परंतु आपल्या ज्ञातीतलेच) कुणाचे निधन झाले असेल–(५) तुम्हाला काही लेख किंवा कविता मुखपत्रिकेसाठी पाठवायची असेल–(६) तसेच ''मुखपत्रिका मिळाली नाही'' असे कळवायचे असेल –तर अशा सर्व बाबींसाठी खाली दिलेल्या ३ नावांपैकी कुणालाही फोन करून वा व्हाट्स्‌ॲपवर कळवावे, ही विनंती.

(१) श्री. देवदास नाडकर्णी–९३२२२ ७२५१५ (२) श्रीमती मृदुला भांडारकर – ९३२२२३६२५७
(३) श्री. प्रसाद कसबेकर – ९८२०५०१५५१ – धन्यवाद., संपादक

# Mangsidesh Investments Pvt. Ltd


Amfi - Registered Mutuual Fund Distributor

1,2,3 Crystal Tower, Gundavali Road no. 3, Off Andheri-Kurla Road, Andheri East, Mumbai 400069 Phone No. +022 69739900 to 9999

## Education is every child's right, and every parent's responsibility.

| Monthly SIP | Expected Corpus in 15 Yrs | Expected Corpus in 20 Yrs |
|---|---|---|
| 5,000 | ₹ 25.22 Lakhs | ₹ 49.95 Lakhs |
| 10,000 | ₹ 50.45 Lakhs | ₹ 99.91 Lakhs |
| 15,000 | ₹ 75.68 Crore | ₹1.49 Crore |
| 20,000 | ₹1 Crore | ₹ 1.99 Crore |
| 25,000 | ₹1.26 Crore | ₹ 2.49 Crore |

Assuming Rate of Return : 12% p.a




**Mutual Fund Investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.**

# संस्कृत भारती शिबिर

श्री रामेश्वर मंदिर, सरस्वती बाग, जोगेश्वरी येथे संपन्न झालेल्या १० दिवसीय संस्कृत संभाषण शिबिराचा अहवाल – कालावधी: ०४.०४.२०२६ ते १३.०४.२०२६

वेळ : दुपारी ३:०० ते संध्याकाळी ५:०० वाजेपर्यंत असा होता.

स्थळ : श्री रामेश्वर मंदिर संस्थान येथे आयोजित केले होते.

शिबिरार्थींची संख्या : ४२ (स्त्री पुरुष मिळून) होती.

श्री रामेश्वर मंदिर संस्थान, जोगेश्वरी व संस्कृत भारती यांच्या संयुक्त विद्यमाने १० दिवसीय निःशुल्क 'संस्कृत संभाषण शिबिर' यशस्वीपणे संपन्न झाले. मंदिर केवळ धार्मिक केंद्र न राहता समाजप्रबोधनाचे व सांस्कृतिक जागरणाचे केंद्र व्हावे, या उद्देशाने श्री रामेश्वर मंदिराच्या विश्वस्त मंडळाने या शिबिराचे आयोजन केले होते. संस्कृत भाषेविषयी असलेली 'कठीण भाषा' ही भीती दूर करणे, दैनंदिन व्यवहारात संस्कृतचा वापर सुरू करणे, मंदिराच्या माध्यमातून भाषासंवर्धनाचे कार्य करणे अशा विविध आणि उदात्त हेतूने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वास्तविक पाहता शिबिराची वेळ ही ऐन दुपारी वामकुक्षी घ्यायची वेळ ठेवणे तसे धोक्याचे होते, परंतु श्री रामेश्वराच्या कृपेने, शिबिरार्थींनी आजपर्यंतच्या शिबिरांच्या तुलनेत जास्तीत जास्त हजेरी लावून, ती आमची भीती फोल ठरवली.

संस्कृत भारतीच्या प्रशिक्षित शिक्षिका सौ. स्वाती वाघ यांनी 'वदतु संस्कृतम्' या पद्धतीने शिबिराचे संचालन केले. त्यांच्या सर्व सहकारी वर्गाने व्याकरणाच्या ओढ्याऐवजी गीते, कथाकथन, संभाषण व कृती यांमधून भाषा शिकवण्यावर भर दिला होता आणि बघता बघता संस्कृत संभाषण सोपे वाटू लागले. शेवटच्या दिवशी झालेल्या समारोपाच्या कार्यक्रमात १५ वर्षांच्या बालकांपासून ७०–७५ वर्षांच्या ज्येष्ठांपर्यंत सर्व वयोगटातील ४० हून अधिक स्त्री–पुरुष शिबिरार्थींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता, हे आनंदाने नमूद करावेसे वाटते. संभाषण शिकवताना रोजच्या वापरातील वाक्ये, स्वतःचा परिचय, स्वतःची दिनचर्या, बाजारातील संवाद, कुटुंबातील संभाषण यांचा समावेश असल्यामुळे संस्कृतमध्ये बोलणे सोपे वाटू लागले. अनेक शिबिरार्थींनी संस्कृतच्या शिस्तबद्ध रचनेमुळे उच्चार, स्मरणशक्ती व तर्कक्षमता सुधारते असे आपले मत नोंदवले. संस्कृत ही ब्राह्मणाची भाषा असा जो समज सर्वदूर पसरला आहे, तो या शिबिरात सर्व जातीचे लोक एकत्र शिकत असल्यामुळे 'भाषेला भिंत नसते' हे प्रत्यक्षात दिसले.

सौ. स्वाती वाघ यांनी घेतलेला हा संस्कृतचा वसा कायमचा जपला आहे याचे उदाहरण म्हणजे, संस्कृत संभाषणाचा हा वर्ग ज्यांनी पूर्ण केला त्यांच्यासाठी पुढे अजून संस्कृत शिकता यावे म्हणून आठवड्यातून एकदा जोगेश्वरी स्टेशन जवळच्या जे. इ. एस्. एज्युकेशन कॉम्प्लेक्समध्ये तासाभराचा निःशुल्क वर्ग संस्कृत भारतीतर्फे भरवला जातो.या शिबिरामुळे, मंदिर हे फक्त देवदर्शनाचे केंद्र नसून 'देववाणी'चेही केंद्र होऊ शकते हा विश्वास समाजात निर्माण झाला.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी स्थळ, जाहिरातबाजी पत्रके बेंचर इत्यादी व्यवस्था श्री रामेश्वर मंदिर संस्थानच्या विश्वस्त मंडळाने केलेली असली तरी निःस्वार्थपणे ज्ञानदान करणाऱ्या संस्कृत

भारतीच्या सौ. स्वाती वाघ आणि त्यांना सहकार्य करणाऱ्या सर्व स्वयंसेवक मंडळींचा पार सिंहाचा वाटा आहे. सलग १० दिवस सळसळता उत्साह घेऊन सौ. स्वाती वाघ दुपारी ३ वाजता, श्री रामेश्वर मंदिरात त्यांच्या सहकाऱ्यांसोबत आल्या की सहाजिकच शिबिरार्थींचे मनोबल वाढत होते. शिबिराच्या शेवटच्या दिवशी जवळपास सर्व शिबिरार्थींनी आत्मविश्वासाने १-२ मिनिटे सलग संस्कृतमध्ये बोलून आणि काही शिबिरार्थींनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून, आपल्या प्रगतीची पावती दिली. सौ. उज्वला शेनॉय आणि सौ. मुग्धा पत्की यांनी केलेले सूत्र संचालन उत्तम होते, तसेच श्री. मिलिंद फेणे यांनी पाहुण्याची ओळख करून दिली. मंदिराच्या विश्वस्त मंडळाच्यावतीने केलेल्या भाषणात मी म्हणालो की, संस्कृत भारतीने असे शिबिर आमच्या मंदिराच्या सहयोगाने दरवर्षी आयोजित करावे, आमचे मंदिर सदैव अशा उपक्रमांच्या पाठीशी असेल. त्याचप्रमाणे प्रत्येक शिबिरार्थींना आवाहन केले, की पुढच्या शिबिरात प्रत्येकाने एक तरी नवीन विद्यार्थी संस्कृत भारतीला मिळवून दिला आणि ही साखळी सुरू ठेवली, तर जोगेश्वरीतील जास्तीतजास्त रहिवाशी संस्कृतमध्ये संभाषण करण्यासाठी तयार होतील. एक शिबिरार्थी श्री. सुनील काळकर यांचा वाढदिवस नेमका १३ एप्रिलला असल्यामुळे गुलाब पुष्प देऊन त्यांचे अभिष्टचिंतन केले गेले.

सांगता समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून NKGSB संघाचे श्री. प्रसाद कसबेकर उपस्थित होते, आपल्या छोटेखानी भाषणात त्यांनी संस्कृत भाषेचे महत्त्व सांगितले आणि सनातन धर्माच्या उगमाच्या भाषेचे संवर्धन श्री रामेश्वर मंदिराच्या विश्वस्तांनी ओळखून तिच्या प्रसार आणि प्रचारासाठी महत्त्वाचे पाऊल उचलल्याबद्दल त्यांचे कौतुक केले आणि आपल्या भाषणाचा शेवट 'सर्वात्मका सर्वेश्वरा' हे सुंदर आणि मंदिराच्या वातावरणात अर्थपूर्ण गीत गाऊन केला. संस्कृत भारती तर्फे प्रवक्ता म्हणून श्री. सुमित शाह यांनी शिबिरार्थी बरोबर सोप्या सुलभ संस्कृत भाषेत संवाद साधला. हुशार गुरु आणि त्याच्या लबाड शिष्याची एक छोटीशी गोष्ट सांगून गुरु हाच कसा सर्वश्रेष्ठ आहे हे पटवून दिले. सौ. अक्षदा सामंत यांनी आभार प्रदर्शन केले आणि त्यानंतर अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

संस्कृत संभाषण शिबिराच्या अशा या सुंदर सांगता समारंभाला श्री. राजाराम वागळे, श्री. किशोर भेंडे, श्री. शंकर नाडकर्णी आणि मी असे आम्ही चार विश्वस्त हजर राहू शकलो हे आम्ही आमचे भाग्य समजतो.

प्रत्येक शिबिरार्थींच्या चेहऱ्यावर काही तरी नवीन शिकल्याचे समाधान दिसत होते. हां... हां... म्हणता दहा दिवस कसे गेले समजले नाही आणि सर्वार्थाने शिबिर यशस्वी झाल्याचा आनंद आम्हां मंदिराच्या विश्वस्तांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. असेच शिस्तबद्ध पद्धतीने आयोजित केलेले कार्यक्रम श्री रामेश्वर मंदिरात सतत होत राहोत आणि आमच्या मंदिराचा लौकिक सर्वत्र प्रसारित होत राहो, हीच श्री रामेश्वराच्या चरणी प्रार्थना.

प्रेषक : श्री. उदय नाडकर्णी विश्वस्त श्री रामेश्वर मंदीर संस्थान

=:=:=:=:

# प्रमुख पाहुणे प्रसाद कसबेकर यांचे संभाषण

(खालील भाषणाचे संस्कृत रुपांतर श्रीमती स्वाती वाघ यांच्या सौजन्याने)

सर्वे मान्यवराः उपस्थिताः

सर्वेभ्यः नमः।

पवित्र रामेश्वरमन्दिरस्य प्राङ्गणे संस्कृतभारत्याः संस्कृत-सम्भाषण शिबिरम प्रचलति इति दिव्यसंयोगः। संस्कृतं देववाणी अस्ति। पुरा भारते विद्यालयेषु गुरुकुलेषु संस्कृतेन एव पाठनं-पठनं च प्रचलन्ति स्म। तत्रः सर्वे भिन्नगोत्रिकाः भिन्नवर्गियाः

बालकाः बालिकाः च सहजतया प्रवेष्टुं शक्नुवन्ति स्म। तस्मिन् समये सर्वेषु ग्रन्थेषु काव्येषु वाङ्मयेषु संस्कृत एव दृश्यते। तथैव अद्यापि समग्र भारते संस्कृत-शिलालेखाः प्राप्यन्ते । एषा संस्कृतभाषा अद्यत्वे अपि समग्रे भारते जीवति। किन्तु कालान्तरे भिन्न भिन्न प्रान्तेषु भाषायाः परिवर्तनं जातम्। तस्मात् अन्याः नैकाः भारतीयभाषाः अपि उत्पन्नाः अभवन्। तमिलं वा तेलुगुं वा वदन्तु, बङ्गला वा मराठीं वदन्तु उत्तरभारतीयभाषाणां उत्पत्तिं यदि अन्विष्यामः तर्हि संस्कृतमेव। अद्य हिन्दुनां संगठनस्य आवश्यकता वर्तते। तदर्थं संस्कृतं एवं एक दीर्घ सूत्रं भवितुम् अर्हति। अस्माकं सर्वेषां हिन्दुनां अस्माकं समाजेन सह किमपि सम्बन्धः अस्ति। तथा च अस्माकं कृते एकत्रीकरणस्य नितरां आवश्यकता अस्ति। एतत् तदा एव सम्भवं भविष्यति यदा वयं एकसूत्रेण बध्नामः। संस्कृतभाषा अस्मान् एकस्मिन् सूत्रे बध्नाति। एषा भाषा अस्माकं बोलीभाषा भवेत् ।

इदानींतनकाले जनैः यदा भारतीयभाषया भाष्यन्ते तदा एकस्मिन् वाक्येषु ५-६ (पञ्च-षड्) आंग्लशब्दाः युज्यन्ते। आंग्लशब्दानां स्थाने संस्कृत-शब्दानां योजनं आवश्यकम्। तदर्थं संस्कृतस्य प्रचारस्य प्रसारस्य च आवश्यकता वर्तते। एतस्मिन् कार्ये अस्माकम् कार्ये अस्माकम् अपि दायित्वम् अस्ति।

यदा वयं मन्दिरं गच्छामः तदा वयं संस्कृतस्तोत्रणि संस्कृतमन्त्राः च शृणुमः। कदाचित् स्तोत्राणि श्लोकाः अस्माकं कण्ठस्थः अपि सन्ति। किन्तु वयं तेषाम् अर्थं ज्ञातुं न शक्नुमः।
बहुधा श्लोकोच्चारणे मन्त्रोच्चारणे वा वयं दोषान् कुर्मः। संस्कृते उच्चारणस्य अतीव महत्त्वम् वर्तते।

उदाहरणं वदामि। वयं सर्वे प्रतिदिनं 'घलिन लोटाङ्गणम्' इति प्रार्थनां वदामः। तस्मिन् 'करोमी यत् यत् सकलं परस्मै नारायणप्रति समर्पयामि' इति पङ्क्तिः अस्ति। तत्र बहवः जनाः 'करोमी यज्ञं सकलं परस्मै' इति वदन्ति। आम् वा न वा? एतत् दोषपूर्ण खलु?

एतत् संस्कृतं कार्यं

निरन्तरं वर्धमानं भवतु इति रामेश्वरं प्रार्थयामि। संस्कृतभारत्याः कार्यकर्तृभ्यः अभिनन्दनं उक्त्वा मम वचनात् विरमामि।

धन्यवादाः।

(हा कार्यक्रम योजिल्याबद्दल खास करून श्री. उदय नाडकर्णी, रामेश्रर मंदिराचे ट्रस्टी व श्रीमती स्वाती गिरीष वाघ यांचे मनःपूर्वक आभार!)

(फोटोज् पान क्र. ३१ वर)

## ‘सर्वप्रथम सेवा’ याची व्याप्ती

मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेटस् वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफ्टमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला राहायचे नसते, जे मारून मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी ए टू झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या अनेक संस्थांची कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयलसारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरू करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.

**उद्दिष्ट :** सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवाश्यकता आहे. इच्छुक ज्ञाति बांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करू तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरू करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करू. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.

**संपर्क : न. अ. जोशी : ९८१९३०४५९९/९९२०४०४५९९**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** पोस्ट बॉक्स ११९९०, आझादनगर पोस्ट ऑफीस,
अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३.

**SERVICE FIRST®**

**98193 04599** **99204 04599**

**सर्वप्रथम सेवा®**

**SOCIETY SERVICE RESOURCE**

**SHREE SHANTADURGA SAUNSTHAN**
Kavlem. Ponda - Goa - 403 401
Email: office@shreeshantadurga.com
Tel. : 0832-2319900 / 2312557
Website: www.shantadurga.com
**Mob. No. 9834513091 / 8275011216**



**श्री शांतादुर्गा संस्थान**
**कवळे–फोंडा–गोवा ४०३४०१**
**फोन:०८३२–२३१२५५०/२३१९९००**
E. : office@shreeshantadurga.com
Website: www.shantadurga.com
.: ९८३४५१३०९१/८२७५०११२१६

## REVISION IN ROOM RENT W.E.F. 8TH APRIL 2026

### ROOM CHARGES AS FOLLOWS:

1. Rs. 500/- per day upto 10 days stay for Non-AC
2. Rs. 1000/- per day upto 10 days will be charged to person other than Saunsthan Mahajan for Non-AC
3. Rs. 950/- Per day upto 10 days for AC for Mahajan & Non-Mahajan till 30/09/2026.
4. Check out Time 24 hours.
5. Rs. 100/- only for 3 hours for the Mahajan who intends to do Abhishek.
6. NO OTHER EXTRA CHARGES WILL BE LEVIED.
7. **COMMON ROOM FOR ABHISHEK:-**
   Male Room No. 25 and Female Room No. 12 Reserved **ABSOLUTELY FREE DURING PANCHAMI DAY ONLY.**

**NOTE:** ROOM BOOKINGS ARE LIMITED TO A MAXIMUM DURATION OF 10 CONSECUTIVE DAYS. A MINIMUM INTERVAL OF 1 DAY MUST BE OBSERVED BEFORE INITIATING A NEW BOOKING.

### VAHAN CHARGES PER UTSAV EFFECTIVE FROM 1ST MAY 2025

| | | |
|---|---|---|
| 1. | LALKHI, MAYUR, HAUNS<br>SINHA,GARUDA,SUKHASANRATH | Rs. 3500/- Per Vahan |
| 2. | PALKHI (only during Panchami) | Rs. 3500/- |

Shree Shantadurga Saunsthan
Shailesh Durganand / Shenvi Sanvordekar
Secretary/Kamavisdar

= = = = = = = = = =

# श्रद्धांजली

## Mohan Shantaram Kasbekar

**Our Beloved Pappa**

***पुण्यतिथी***

## कै. मोहन शांताराम कसबेकर



**पाहता तुझला देवा पाहणे संपले**
**पाहुनिया डोळेभरी मन तृप्त झाले.**

**ह्या १५ सप्टेंबर रोजी ऋषिपंचमीला इहलोक त्यागून ५४ वर्षे पूर्ण होत आहेत.**

**देहावसान :** ऋषि पंचमी (भाद्रपद शुद्ध पंचमी)

**दिनांक १२ सप्टेंबर १९७२**

(आम्हां सर्वांना तुझी आठवण येत नाही असा एकही दिवस जात नाही)

**–प्रसाद मोहन कसबेकर कुटुंब**

**संध्या विलास सोहोनी कुटुंब**

**नवनीत मोहन कसबेकर कुटुंब**

## आम्हास सापडली अनमोल हिरे माणके

संकल्पना: सुरेश पालेकर

आपल्या समाजात विविध क्षेत्रात अनेक उदयोन्मुख व्यक्ती आहेत ज्यांची समाजाला ओळख नाही. व्यवसायात व्यस्त राहिल्याने किंवा संकोच अशा कारणाने समाजाच्या कार्यक्रमास हजर राहण्यास त्यांना वेळ मिळत नसेल. आम्ही अशा व्यक्तींना शोधत आहोत.

आमच्या समाज बांधवांना विनंती आहे आपणास माहीत असल्यास अशा ऊदयोन्मुख व्यक्तींची नांवे आम्हास जरूर कळवा.

कोण असणार ह्या मान्यवर व्यक्ती

१. साधारण, वय वर्षे ४० ते ५५ वयोगटातील

२. भारतात राहणारे

३. भारतात नोकरी / व्यवसाय करणारे

आपले सर्वांचे सहकार्य मिळाल्यास काम सोपे होईल. लिहून कळवा.

या संदर्भात आम्हास माहीत झालेली पहिली व्यक्ती आहे...

श्री. कविश कसबेकर – मुंबई

वडील श्री. मच्छिंद्र कसबेकर–मुंबई–कारवार

आई – सौ. मुक्ता (सुहास) कसबेकर

आजोबां– अनंत कसबेकर–कारवार

आजी–अहिल्या (कस्तूरी) कसबेकर

ही फॅमिली मुळची कडवाडची आहे.

Kavish Kasbekar has over two decades of experience in digital transformation and operational excellence. Based in Mumbai, he serves as AVP in the CEO's Office (Strategy and Transformation) at Datamatics Global Services, where he works on enterprise strategy, operating model transformation, and technology-enabled growth initiatives. His experience spans consulting, project management and Large-scale business Transformation. Kavish holds an executive M. B. A. from Manipal and a Master's In computer management From Pune University. He is also a Lean six sigma Black belt.

***

**वाचकहो, पुढील अंकापासून आम्ही लहान मुलांसाठी (वय वर्ष १५ पर्यंतची मुले) एक नवीन सदर मुखपत्रिकेच्या पान २६ वर उघडत आहोत ह्याची संकल्पना श्रीमती शैलजा नाडकर्णी यांची आहे.**

**त्यात ही मुले आपली चित्रकला, छोटी एखादी गोष्ट, कविता किंवा एखादा विनोदी किस्सा इंग्रजी / मराठीतून पाठवू शकतात. त्यांनी लेखा बरोबर आपले नांव, पत्ता, फोन क्रमांक–जरूर द्यावा. अट : मुले आपल्या ज्ञातीतीलच असावीत (आई किंवा बाबा एक कुणीतरी आपल्या ज्ञातीतील असावे) धन्यवाद. – संपादक**

## ठाणे मंच आयोजित दोन रात्री व तीन दिवसांची
## ऑगस्ट पावसाळी सहल

**ठिकाण – अलिबाग (SIDZ COTTAGE, NAGAON, ALIBAUG.)**

तारीख – **५ ते ७ ऑगस्ट २०२६ (श्रावण महिना सुरु होण्याआधी २ रात्र व ३ दिवस)**

**संपूर्ण प्रवास एसी बसने– आकार प्रत्येकी : रुपये ११,५००/–**

(आकार कमी झाल्यास शिल्लक राहिलेले पैसे परत केले जातील.)

*पैसे भरण्यासाठी*

**Bank Details : NKGSB Co - Op. Bank, Naupada, Thane.**

**SB a/c no. : 020100100001816**

**IFSC code: - NKGS0000020**

संपर्क :

**१) सुरेश पालेकर – ८९२८८५०१९३**

**२) राजेश दिवेकर – ९६१९३६२४६०**

**३) गिरिश रेगे – ९९२२९६८७२५.**

**A name that spells its class !**

# WINOVER
## CATERERS

**Marriages, Thread Ceremonies,**
**Engagement and Birthday Parties Etc.**

**WE DELIVER FOOD / SNACKS FOR**
**PARTIES AT HOME**

**Take away and TIFFINS Or opt for Ala-carte**
**Amchi food and Variety cuisines**

ALL OVER MUMBAI-THANE-VIRAR

**Call or Whatsapp for our take away menu**
**Vinod Kaval / Ashwini / Rupali**
**98208 43392 / 90048 41198 / 98923 00608**


**Shop No. 4, Andrea Apartment off Azad Road, Vile Parle East, Mumbai - 400 057**



**Inauguration of the Chemical Exhibition in Surat**







Dr. Satish Vaman Wagh inaugurated the Chemical Exhibition in Surat on 22nd May'26 (shown in photo) as well same night played cricket with GCCI chamber team(shown in photo)and distributed the trophies.

**–चुकीची दुरुस्ती–**

प्राची देसाई यांच्या मागील अंकाच्या डी एन वरील लेखात वरून दुसरे वाक्य अनवधानाने राहून गेले ते खाली दिले आहे.

DN did not know Pradeep, on interdepartmental introduction, DN asked him about native place, corrected him that its Kumta not Karwar and told him his entire family tree, naming his family and relations!! … in the office itself, amazing knowledge.

ह्या ४ ओळी चुकीची दुरुस्ती या सदरात घेतल्या आहेत.

धन्यवाद. तसदी दिल्याबद्दल क्षमस्व. – प्रसाद कसबेकर.

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या
## (मागील अंकानंतर )
## उल्लेखनीय देणग्या

### १) श्री. मोहन किशोर सबनीस व श्रीमती निशा केदार पालेकर यांजकडून संघास रु. २,००,०००/- ची देणगी

गेल्या पिढीतील सरस्वती बाग, जोगेश्वरी येथे रहाणारे श्री. वासुदेव गजानन सबनीस हे एक कर्ते पुरुष वास्तव्यास होते. त्यांचे ठाणे येथे राहणारे सुपुत्र श्री. किशोर सबनीस हे दरवर्षी आपल्या आईवडिलांच्या नावे संघास देणगी देत असत. त्यांचाच वारसा त्यांचे चिरंजीव श्री. मोहन व कन्या श्रीमती निशा केदार पालेकर यांनी आईवडिलांच्या नावे व वडिलांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित रु. २ लाख रुपयांची देणगी संघास दिलेली आहे. यापूर्वी ही त्यांनी रु. ५ लाख रुपयांची देणगी दिली होती.

### २ ) डॉ. नरेंद्र यार्दी यांजकडून एज्युकेशन सोसायटीस रु. १ लाखाची देणगी

बड़ोदा येथील एक उद्योजक डॉ. नरेंद्र रामतीर्थ यार्दी प्रतिवर्षी एज्युकेशन सोसायटीस देणग्या देतात. यंदाही त्यांनी एज्युकेशन सोसायटीस १ लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### ३) मुझुमदार कुटुंबियांकडून संघाच्या वृद्धसेवेस १ लाख रुपयाची देणगी

वाशी येथे रहाणारे सर्वश्री साईप्रसाद व योगेश, स्नुषा श्रीमती वृंदा साईप्रसाद व नात कुमारी अमेया यांजकडून आईवडील श्रीमती संजीवनी व डॉ. मारुती वामन मुझुमदार यांच्या नावे संघाच्या वृद्धसेवेस एक लाख रुपयाची देणगी मिळाली आहे.

=:=:=:=:

अरुण भास्कर कसबेकर यांच्या “ **कवडसे मनाचे** ” ह्या पुस्तकाला वाचकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. तरी अजून ज्यांना हे पुस्तक विकत घ्यावयाचे असेल त्यांनी NKGSB SANGH च्या Office मध्ये संपर्क साधावा.

ऑफीस फोन नंबर मुखपत्रिकेच्या कव्हर पेजवर दिला आहे. धन्यवाद.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती माया व श्री. गिरीश शंकर पिकळे यांच्या ५० व्या विवाहाच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ त्यांच्याकडून | ११,००० |
| २. | श्रीमती शांता व श्री. वासुदेव जनार्दन कामत यांच्या स्मरणार्थ कामत कुटुंबियांकडून | २५,००० |
| ३. | श्रीमती मीरा वं श्री. रघुनाथ सदाशिव कंटक यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नातेवाईकांकडून | २५,००० |
| ४. | श्रीमती प्रभा व श्री. पुरुषोत्तम भास्कर वाघ यांच्या स्मरणार्य कन्या श्रीमती विद्या दिलीप पै यांजकडून | २०,००० |
| ५. | श्री. देविदास विश्वंभर कसबेकर यांजकडून | ५,००० |
| ६. | दि एन के जी एसबी को-ऑप बँकेकडून | १०,००० |
| ७. | श्रीमती वृंदा व श्री. गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ भाचे सर्वश्री आनंद व दिलीप गणपत आरस यांजकडून | २,००० |
| ८. | श्रीमती सविता व श्री. किशोर वासुदेव सबनीस यांच्या स्मरणार्थ श्री. किशोर वासुदेव सबनीस यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त (६ मे २०२६) पुत्र श्री. मोहन व कन्या श्रीमती निशा केदार पालेकर यांजकडून | २,००,००० |

## वृद्ध सेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती संजीवनी व डॉ. मारुती वामन मुझुमदार यांच्या स्मरणार्थ  पुत्र सर्वश्री साईप्रसाद व योगेश व स्नुषा श्रीमती वृंदा साई प्रसाद व नात कुमारी अमेया यांजकडून | १,००,००१ |
| २. | श्रीमती सुषमा सुबोध मुळगांवकर यांनी आपले दिवंगत पति श्री. सुबोध मंगेश मुळगांवकर यांच्या स्मरणार्थ. | १,०००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती प्रभा व श्री. पुरुषोत्तम भास्कर वाघ यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती विद्या दिलीप पै यांजकडून | २०,००० |
| २. | दि एन के जी एस बी को-ऑप बँकेकडून | १०,००० |
| ३. | डॉ. नरेंद्र रामतीर्थ यार्दी यांजकडून | १,००,००० |
| ४. | श्रीमती वृंदा व श्री. गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ भाचे सर्वश्री आनंद व दिलीप गणपत आरस यांजकडून | १०,००० |

| | | |
|---|---|---|
| ५. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या १७ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अजित यांजकडून | २,००१ |
| ६. | श्रीमती गंगाबाई व श्री काशिनाथ त्रिबंक नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ नाडकर्णी कुटुंबियांकडून | ५,००० |
| ७. | श्री. अशोक काशिनाथ नाडकर्णी यांच्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती शामल यांजकडून | २,५०० |
| ८. | श्री. अशोक काशिनाथ नाडकर्णी यांच्या पुण्यतिथीनिमित्त कन्या श्रीमती विद्या मनोज भांडारकर यांजकडून | २,५०० |
| ९. | श्रीमती संजीवनी मारुती मुझुमदार यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. साईप्रसाद यांजकडून | १०,००० |
| १०. | श्रीमती वीणा श्रीकांत गायतोंडे यांजकडून | १५,००० |

## लैला भटकळ यांचे निधन

### विशेष विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी भरीव कार्य

विशेष विद्यार्थ्यांसाठी आयुष्यभर झटणाऱ्या लैला भटकळ (८७) यांचे हल्लीच वृद्धोपकाळामुळे मुंबईत निधन झाले. पॉप्युलर प्रकाशनचे संचालक रामदास भटकळ यांच्या त्या पत्नी होत. भटकळ यांच्या पश्चात पती दोन मुलगे व सुना असा परिवार आहे. शिक्षण आणि क्रीडा या दोन्ही क्षेत्रांत रस असलेल्या लैला भटकळ यांनी विवाहानंतर समाजशास्त्र आणि संस्कृत या विषयात पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. वांद्रे येथील 'सॅपलींग' शाळेत मुख्याध्यापिका म्हणून तब्बल २५ वर्षे त्यांनी कार्यभार सांभाळला. निवृत्तीनंतर ही सतत नवीन शिक्षणाकडे त्यांचा कल होता.

विद्यार्थीप्रिय, शिस्तप्रिय आणि संवेदनशील शिक्षिका म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांच्या जाण्याने विद्यार्थ्यांची चिंता वाहणाऱ्या शिक्षणव्रती हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

## || कालाय तस्मै: नम: ||

| | नाव | सध्याचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | श्रीमती शितल उदय तेलंग | अंधेरी |
| २. | श्रीमती सरिता(ललीता) सदानंद तेलंग | ठाणे |
| ३. | श्रीमती अंबिका (गंगाताई) श्रीधर वाघ | पवई |
| ४. | श्री. नितिन रमाकांत वर्टी | पुणे |

# संस्कृत भारती कार्यक्रम

संस्कृत भारतीच्या सौ. स्वाती वाघ
व श्री. सुमीत शहा प्रमुख पाहुणे
श्री. प्रसाद कसबेकरांचे
स्वागत करताना.







मंचावरील सर्व मान्यवरांसमोर
प्रमुख पाहुणे
श्री. प्रसाद कसबेकर
भाषण करताना.

संस्कृत भारतीचे प्रेक्षक
प्रार्थना करताना.



Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक प्र. मो. कसबेकर यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.